॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** **Public Relations Office (PRO)** **website: srtmun.ac.in**
**Phone: (02462) 215325** **जनसंपर्क कार्यालय** **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/२१२ दि.२८/१०/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठाचा कबड्डी मुलींचा संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी पात्र




नुकत्याच अमरावती येथे दि. २२ ते २६ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी (मुली) स्पर्धेमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मुलीच्या संघाने सहभाग नोंदविलेला होता. या स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक मिळवून विद्यापीठाचा कबड्डी संघ (मुली) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

सलग तीन वर्षे संघाने पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेत यश मिळवले आहे. कु. अरुणा पवार यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट चढाई सानिका पाटील, प्राची लोहार, उत्कृष्ट पकडी अनुराधा जाधव यांच्या सहकार्याने या स्पर्धेमध्ये यश संपादन केले आहे. विजयी संघातील खेळाडू सानिका पाटील, अरुणा पवार, अनुराधा जाधव, अमृता दिवसे, प्राची लोहार, प्रेक्षा पाटील, गौरी दहे, गीता तुरे, संध्या पिंपळे, आरती शहा व आकांक्षा राठोड यांचा समावेश आहे. संघा सोबत संघ मार्दर्शक डॉ. लहू फड, संघ व्यवस्थापक डॉ. छाया कोठे हे राहणार आहेत.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डी.डी. पवार, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांनी विजयी खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

---